नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १५/०६/२०२२ (बुधवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील पारडसिंगा ज्ञान मंदीर येथे दिनांक १४/०६/२०२२ चे १०.३० वा. चे ११.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ. शेवंताबाई रामदासजी बन्नगरे, वय ४५ वर्ष, रा.माणीकवाडा जि.वर्धा हि पारडसिंगा मंदीरामध्ये दर्शन करण्यासाठी आली व गर्दी असल्याने दर्शन करण्यासाठी लाईन मध्ये लागली दर्शन घेवुन मोठया मंदीराचे गाभाऱ्यात आली तेथुन हॉलमध्ये किर्तन ऐकण्यासाठी गेली असता तिचे सोबत तिची आईला तिचे गळयातील सोन्याची पोत दिसली नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे गळयातील २ तोळयाची सोन्याची पोत किंमती ३७,०००/—रू. ची चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास परि पोलिस उपनिरीक्षक श्री बोळगीर हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

**१) पो.स्टे. बेला** :— अंतर्गत २२ कि.मी अंतरावरील मौजा सिर्सी येथे दिनांक १३/०६/२०२२ चे १५.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— खेमराज रामचंन्द्र पडोळे, वय ४८ वर्षे, रा. कामगार नगर, कळमना ता. जि. नागपुर व आरोपी १) प्रणय पांडुरंग पडोळे वय २७ वर्षे हे एकमेकांचे नातेवाइक असुन त्यांचा शेती व घराचे जागेचा वाद आहे. घटना ता वेळी व ठिकानी घराचे व शेतीचे हिस्सेवाटनी वरून त्यांच्या आपसात वाद सुरू झाला. तेव्हा आरोपी क्र. १) प्रणय पांडुरंग पडोळे वय २७ वर्षे, २) अक्षय पांडुरंग पडोळे वय २५ वर्षे ३) रूख्मानंद रामचंद्र पडोळे वय ५५ वर्षे तिन्ही रा. सिर्सि ४) केशव वसंता बावने वय ३८ वर्षे ५) सौ. बेबीबाइ वसंता बावने वय ६५ वर्षे दोन्ही रा. मांडगाव ता. समुद्रपुर जि.वर्धा, ६) निखील नारायन लोनकर वय २३ वर्षे व ७) सौ. कांताबाइ नारायन लोनकर वय ४५ वर्षे दोन्ही रा. हिंगनघाट जि. वर्धा यांनी फिर्यादी सोबत झगडा भांडण करून शिविगाळ करून हातबुक्यानी मारहाण केली. आरोपी हे लाठीकाठीने मारहाण करीत असता जिवाने मारन्याची धमकी दिली व फिर्यादीने काठी अडविन्याचा प्रयत्न केला असता त्यांना काठी हि डोक्यावर लागुन ते जखमी झाले. तेव्हा फिर्यादीची पत्नी शोभा पडोळे व मुलगा अनिकेत मध्यस्ती करन्याकरीता गेले असता त्यांना सुदधा मारहाण केल्याने पत्नी हीला दंडाला व मनगटाला जखम झाली असुन खांदयाला मुक्का मार लागला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२४, १४३, १४७, ५०४, ५०६ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार कुणाल ठाकुर मो.नं. ९८६०६६११६४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. बेला** :— अंतर्गत २२ कि.मी अंतरावरील मौजा सिर्सी येथे दिनांक १३/०६/२०२२ चे १५.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— केशव वसंता पाहुने वय ३८ वर्षे, रा. महाडगाव ता. समुद्रपुर जि. वर्धा व आरोपी १) ओमकार रामकृष्ण पडोळे वय ३५ वर्षे, २) संदिप रामकृष्ण पडोळे वय ३० वर्षे दोन्ही रा. परसोडी ता. उमरेड जि. नागपुर ३) हेमराज रामचंन्द्र पडोळे वय ४८ वर्षे, ४) शोभा पडोळे वय ३५ वर्षे, सर्व रा. कळमना ता. जि. नागपुर व दोन १७ वर्षीय (विधिसंघर्श बालक) हे एकमेकांचे नातेवाइक असुन शेतीचे व घराचे जागेच्या कारणावरून आपात वाद आहे. घटना ता. वेळी व ठीकानी घराचे व शेतीचे हिस्सेवाटनी वरून आपसात वाद सुरू झाला. तेव्हा लहान मामा हेमराज पडोळे व मावसभावु निखील लोनकर मावशि व आई व मामा रूख्मानंद पडोळे मामेभावु अक्षय, पांडुरंग पडोळे, प्रणय पांडुरंग पडोळे यांनी फिर्यादीचें सोबत वादविवाद करून ढकलढुकल केले व मारन्याची धमकी दिली. फिर्यादीचा मावसभावु निखील लोनकर याने हातबुक्याने व लाठीकाठीने फिर्यादींना मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीचा डाव्या हाताच्या बोट हा मधुन फाटुन रक्त निघत आहे व निखिल याला उजव्या पायाला काठीने मारहाण केल्याने मुक्का मार लागला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२४, १४३, १४७, ५०४, ५०६ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार कुणाल ठाकुर मो.नं. ९८६०६६११६४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**